प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.)
ता.वसई, जि.पालघर, पिन 401 203.

दूरध्वनी : 0250-2402179/2403224/2402101
फॅक्स : 0250-2402563
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जा.क्र. : व.वि.श.म./जाप्रवि/८६४/2020-21
दिनांक : 29/10/2020

## जाहिर दरपत्रक

याद्वारे कळविण्यांत येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यक्षेत्रातील खालील यादीतील नमुद तलाव सन २०२० ते सन २०२३ या तीन वर्षांकरिता ठेका पद्धतीने मत्स्यसंवर्धनाकरिता देणेकामी दरपत्रक मागविणेकामी जाहिर दरपत्रक सुचना **दि. ०२/११/२०२० रोजी सका. ११.०० वाजलेपासून ते दि. १०/११/२०२० रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत** महानगरपालिकेच्या vvcmc.in या संकेतस्थळावर तसेच प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करणेंत येत आहे. इच्छुक दरपत्रकधारकाने सदर कामाचे दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये **दि. १०/११/२०२० रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत** प्रभाग समिती (ई) नालासोपारा कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागात सादर करावेत.

| अ.क्र. | तलावाचे नाव | किमान देकार रक्कम | ठेकेदाराने भरावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | कोरलमान तलाव | १,०५,३८६/- | |
| २ | डेरा तलाव | २७,०००/- | |
| ३ | काळुंजा तलाव | २,९७,०००/- | |
| ४ | एंडाळे तलाव | ७२,५१०/- | |
| ५ | कोरला तलाव | ४८,२२५/- | |
| ६ | तळपा तलाव | ३९,१००/- | |
| ७ | कोळबाव तलाव | ५२,८००/- | |
| ८ | खुटलई तलाव | ७४,८००/- | |
| ९ | आंबड तलाव | १,११,१००/- | |
| १० | भाटेला तलाव | १,४९,७७५/- | |
| ११. | कुंभेर तलाव | २,६३,७६५/- | |
| १२. | नवाळे तलाव | १,३६,८३९/- | |
| १३. | वाटाण तलाव | ४२,६६५/- | |

### अटी-शर्ती

१. **वरील तलावाच्या मंजुर रक्कमेवर प्रति वर्षी १०% वाढीने रक्कम भरणा करणे मंजुर दरपत्रक धारकावर बंधनकारक असेल.**

२. **दरपत्रक धारकाने महानगरपालिकेची कोणत्याही विभागाची (कर विभाग, पाणीपट्टी विभाग तसेच वरील प्रकारच्या यापुर्वीच्या निविदेतील कोणतीही थकबाकी) नसलेबाबतचचे प्रमाणपत्र दरपत्रकासोबत सादर करणे बंधनकारक आहे.**

३. **सदर विषयी दरपत्रक/कोटेशन फॉर्म नमुना वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (ई) कार्यालयातून दि. ०२/११/२०२० ते दि. १०/११/२०२० पर्यंत कार्यालयीन वेळेत सामान्य प्रशासन विभागाकडून उपलब्ध करुन घ्यावा. (संपर्क :- श्री. संजय पाटील, मो. नं. ९८३४६६४५२६)**

४. दरपत्रक धारकाने दरपत्रकातील दर भरताना जी.एस.टी. करासहित दर भरावयाचे आहेत.

५. दरपत्रकधारकांचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यांत यावी.

६. एक वर्षाचा अनुभव किंवा कामाचा कार्यादेश (शासकीय) सादर करणे आवश्यक आहे.

७. दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.) येथील सामान्य प्रशासन विभागात सादर करणे बंधनकारक राहील.

८. दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालात उपस्थित राहून रु. १००/- चे करारपत्रावर करारनामा लिहून द्यावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यांत येईल.

९. दरपत्रकातील दर सादर करताना सर्व करासहित दर्शविण्यात यावे.

१०. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार महापालिकेस राहील.

११. वरील अटींचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणी अंती अपात्र ठरविण्यांत येतील.

१२. वरील तलावांची दरपत्रके बंद लिफाफ्यात दि. ०२/११/२०२० ते दि. १०/११/२०२० या दिवसापर्यंत दु. ४.०० वाजेपर्यंत प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.) येथे सादर करावित.

१३. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. १०/११/२०२० रोजी दु. ४.०० वाजता अथवा तद्नंतर सोयीनुसार मा. सहा.आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यांत येतील.

29.10.2020.
(पंकज भुसे)
सहा.आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा
वसई-विरार शहर महानगरपालिका